
# Cosmos Multidisciplinary Research E-Journal

Recognized International Indexed & Peer Reviewed Journal

**ISSN 2456-1665**

**IMPACT FACTOR 4.94**

**VOLUME VI | ISSUE I | JANUARY 2021**


**Prof. Dr. Gajhans D.S.**
Chief Editor

**Dr. Tukaram Gajar**
Executive Editor & Publisher

# INDEX


| Sr. No. | Title of article | Author / Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | A Geographical Analysis of Gender Disparity Index of Literacy in Osmanabad District | Dr. Tatipamul R. V. | 1-6 |
| 2 | Population Characteristics of Aurangabad District | Dr. Pankaj Y. Shinde | 7-12 |
| 3 | The Process of Triangulation of Trait Anxiety, Type of Personality & Adjustment | Tanuja Kher<br>Dr. Vijay Kulkarni | 13-24 |
| 4 | Effect of Soil Borne Fungi on Seed Germination of Brinjal and their Bio-control by using Trichoderma species | Mr. Anarse P.S. | 25-28 |
| 5 | Make in India: Opportunities and Challenges | Dr.S.L Padgalwar | 29-35 |
| 6 | Geographical Analysis of Road Densities in Aurangabad Division (Maharashtra State) | Dr. Mahesh B. Lavate | 36-41 |
| 7 | Role of Banking Sector in Women Empowerment | Dr. S.J.Bhavsar | 42-47 |
| 8 | विविध क्षत्रातील उद्योजगता | प्रा. ससाणे अशोक नामदेव | 48-52 |
| 9 | 'साये मे धूप' गझ़ल में राजनीतिक विमर्श | डॉ. संतोष आडे | 53-58 |
| 10 | पर्यटन उद्योग में भूगोल का महत्व | Dr. Mahendra Pal Singh<br>Dr. Ajeet Kumar Mishra | 59-65 |
| 11 | A study on Use of Effective ICT Tools in Secondary Schools to Impart Education Online During the COVID - 19 Outbreak in Aurangabad City & The Way Forward | Anita Pisote<br>Dr. Rajendra Gaikwad<br>Saurabh Kohli<br>Dr. Nalini Chondekar | 66-79 |
| 12 | Effect of Age and Area of Residence on Ego-Strength of Urban and Rural Women's | Dr. Raypure S.E. | 80-84 |
| 13 | भारतीय स्त्री: गुलामगिरी व स्त्रीवाद | प्रा.डॉ. कार्तिक गावंडे<br>माळी नितीन | 85-89 |
| 14 | Population Distribution in Jalna District: A Geographical Study | Jadhav V. L. | 90-93 |
| 15 | पर्यावरण संरक्षण व शाश्वत विकास | डॉ. शिरीष सांगोळे<br>सुनिल कायंदे | 94-96 |
| 16 | The Concept of beauty in Wali Aurangabadi's Urdu Poetry | Dr. Ansari Masood Akhtar | 97-99 |
| 17 | AMEER KHUSRU: As a Moral Teacher | Ghazala Hafeez | 100-103 |
| 18 | Concept of Feminism in Short Stories of Qurratul-Ain Hyder | Syed Shabbir Syed Vazeer<br>Prof. Dr. Maqbool Saleem | 104-106 |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# विविध क्षेत्रातील उद्योजगता

**प्रा. ससाणे अशोक नामदेव**
अर्थशास्त्र विभाग,
अनंतराव पवार महाविद्यालय,
पिरंगुट ता. मुळशी,
जि. पुणे ४१२११५

**प्रस्तावना :-**

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये मिश्र अर्थव्यवस्था आहे. उद्योजक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उत्पादन करुन देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये उत्पादन करुन देशाला स्वावलंबी बनवतात. उद्योग वाढल्यामुळे बेकारी, नवीन रोजगार संधी, गुंतवणूक प्रेरणा व आर्थिक विकास यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होतात. त्यातून आर्थिक विकास साध्य होतो. नवनवीन उद्योग सुरु झाल्यामुळे विविध प्रकारच्या वस्तुचे उत्पादन बाजारपेठामध्ये येऊ लागल्याने ग्राहकाला नाविन्यपूर्ण वस्तु खरेदी करता येतात. बाजारपेठांचा विस्तार वाढतो. लोकांच्या राहणीमाणात वाढ होते. औद्योगिकरण वाढल्याने जनतेमध्ये उद्योजकीय प्रवृत्ती वाढीस लागते.

भारतासारख्या विस्तीर्ण देशामध्ये आज बेरोजगारांची प्रचंड संख्या आहे. यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना सिते. सर्व प्रशिक्षित व सुशिक्षीत तरुणांना रोजगार मिळणे शक्य नाही. यासाठी आजच्या तरुणांनी महाविद्यालयीन शिक्षण किंवा व्यवसायीक कोर्स पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या मागे न धावता नवीन उद्योग सुरु करुन उद्योजक होणे हा एक चांगला बहुमोल असा पर्याय होऊ शकतो. आपल्या परीसरात नेमक्या कोणत्या व्यापारी संधी उपलब्ध आहेत. याचा नेमकेपणा ओळखून छोटेह्रमोठे व्यवसाय सुरु करणे आवश्यक आहे. नवीन व्यवसाय सुरु करुन स्वत:चे करीअर स्वत: घडवू शकतो. स्वत:ची बेकारी कमी करुन इतरांनाही आपण रोजगार उपलब्ध करुन देऊ शकतो. सध्या भारतात मोठ्या प्रमाणात बेकरी वाढत चालली आहे. यावर सर्वात उत्तम पर्याय म्हणजे भारतासारख्या जास्त मनुष्यबळ असलेल्या देशामध्ये उद्योजक बनणे हा जीवनातील स्वत: निवडलेल्या एक चांगला पर्याय असून नव्या युगातील नवीन भारत घडवण्यासाठी उद्योजकता हा एक चांगला बहुमुल्य असा पर्याय असून त्यावर भर देणे नवीन भारत घडवणे होय.

**उद्योजकतेची उद्दिष्टे :**

१) स्वयंम रोजगार भर देऊन उद्योग वाढवणे

२) उपलब्ध भांडवलाची योग्य गुंतवणूक करुन पुरेसा वापर करणे.

३) उद्योजकता प्रवृत्तीमध्ये वाढ करणे.

४) सामाजिक व आर्थिक विकासावर भर देणे.

५) व्यक्तीमत्व विकसाला वाव देणे.

६) आर्थिक स्थैर्य निर्माण करुन जीवनमान वाढवणे.

७) नवीन भारत बनवून आर्थिक स्थिती निर्माण करणे.

८) यशस्वी व होतकरुन उद्योजक निर्माण करुन त्यांना प्रेरणा देणे.

९) पायाभूत सुविधाचा विकास वाढवणे.

१०) महिला उदयोजकांची भावना व जागरुकता निर्माण करणे.

**उद्योजकतेचे महत्व :**

१) बेकारीवर एक चांगला पर्याय असून उद्योजकतेवर भर देणे.

२) नवीन गुंतवणूकीवर भर देऊन उद्योजकता वातारवरण निर्माण करणे.

३) सधिन संप्पती व उपलब्ध घटकांचा योग्य व पुरेपूर वापर करणे.

४) उपलब्ध व विविध प्रकारच्या उद्योगावर भर देणे.

५) नवीन बाजारपेठ निर्माण करुन त्यांचा विस्तार करणे.

६) नवीन व्यवसायावर भर देऊन वाढवणे.

७) विदेशी व्यापाराला प्रोस्ताहन देणे.

८) राष्ट्रीय संपत्तीचे योग्य प्रकारे विभाजन व वितरण करणे.

९) व्यवस्थापकीय कौशल्य, क्षमता, नेतृत्व व जबाबदारी निर्माण करणे.

**अभ्यास पध्दती :**

विविध क्षेत्रातील उद्योजकता या विषयाचा अभ्यास करताना पुस्तके, नेट, पेपर, लेख व दैनिक वर्तमानपत्रे यांचा आधार घेऊन योग्य त्या माहितीच्या आधारे उद्योजकता या विषयाची आवश्यक ती माहिती गोळा करुन या लेखात नमूद केलेली आहे.

**उद्योजकतेला प्रोस्ताहन देणाऱ्या प्रमुख प्रशिक्षण संस्था**

१) जिल्हा औद्योगिक केंद्र (DIC's)

२) भारतीय उद्योजकता विकास संस्था (EDI)

३) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED)

४) बिगर शासकीय संस्था (NEG's)

५) मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स (MCOC)

६) दलीत इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स (DICIYA)

**विविध क्षेत्रातील प्रमुख उद्योजकता :**

भारतामध्ये उद्योजता सुरु करण्याचे अनेक मार्ग आहेत. परंतु यापैकी निवड करताना ज्या उद्योग व्यवसायाची माहिती चांगल्या प्रकारची असेल असेल असे व्यवसाय निवडावेत जेणेकरुन व्यवसाय सुरु करताना कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागात सध्या लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते त्यामुळे ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात व्यवयाय सुरु करण्यास बाब आहे.

**१) इंजिनिअरींग उद्योग**

या उद्योगामध्ये अनेक प्रकारच्या उद्योगाला समाविष्ट होतो. मोटारी, जीप, बस, स्कुटर,मशीन टुल्स, टाईप रायटर, संगणक, लॅपटॉप, पंखे, दिवे, फ्रिज, कुकर मशीन व वातानुकीन यंत्रे या सर्व उद्योगाचा यामध्ये समावेश होतो. अशा प्रकारच्या उद्योगामध्ये प्रवेश केल्यास कायमस्वरुपी बाजारपेठात ग्राहक उपलब्ध नसतो. हे उद्योग भांडवली उद्योग अथवा

उपभोग वस्तू उद्योग म्हणून ओळखला जातो. या प्रकारच्या वस्तूंना बाजारामध्ये ग्राहक उपलब्ध असून त्याचा वापर, सर्वच क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येतो. त्यामुळे या उद्योगांना सध्याच्या काळात अन्यन साधारण महत्त्व आहे.

२) **खाद्यपदार्थ उद्योग**

सध्याच्या युगामध्ये फास्टफुड या पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झालेली आहे. यामध्ये विशेषत: पिझ्झा, पावभाजी, तळलेले पदार्थ, चायनीज फळाचा ज्युस इ. पदार्थांना विशेष आणि चांगल्या प्रकारची मागणी आहे. अशा प्रकारचे व्यवसाय सुरु केल्यास उद्योजकतामध्ये स्वत:चे एक चांगले करीअर घडवू शकते. व्यवसायासाठी फार मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता नसते. परंतु जेमतेम भांडवल उभारुन असे व्यवसाय सुरु करता येतात. याशिवाय तयार लोणची, पापड, केक, बेकरी व्यवसाय, बिस्किट, मुरांबे, फरसाण, चॉकलेट, कुरकुरे व उपवासाचे सर्व प्रकारचे पदार्थ इत्यादी प्रकारच्या पदार्थांना बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात मागणी असून नियमती ग्राहक उपलब्ध आहेत. त्यामुळे खरेदी विक्री नफा यांचे समीकरण योग्य वेळी जमवणे सहज सोपे असते. या व्यवसायातून नफा चांगल्या प्रकारचा असल्याने उद्योजकता म्हणून तरुणांनी असे व्यवसाय निवडणे सध्याच्या काळात अतिशय फायद्याचे आहे.

३) **मॉल मार्केट/घरसंसार**

प्रगत राष्ट्राप्रमाणे आपल्या देशामध्ये सध्या मोठ्या शहरामध्ये मॉल मार्केट, बिग बाझार व घर संसार यासारखे मार्केट मोठ्या प्रमाणात आहेत. ही मार्केट अतिशय अल्पावधीत प्रसिध्द झालेली आहे. दैनंदिन जीवनामध्ये लागणाऱ्या सर्व प्रकारच्या वस्तू खाद्य पदार्थ, स्टेशनरी, कपडे, बूट, शोभेच्या वस्तू व किराणा माल इत्यादी प्रकारचा माल योग्य किमतीत तसेच काही प्रमणात सुट दिली जाते. मोठ्या प्रमाणावर मध्ये व गरीब कुटुंबातील लोकांना हा बाजार अतिशय चांगला असून असे बाजार अथवा मॉल उभारणे हे अलीकडच्या काळात उद्योजकता म्हणून ओळखले जाऊ लागलेले आहे.

४) **केटरींग उद्योग व हॉटेल व्यवसाय**

शहराबरोबरच ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात लग्न सभारंभ, वाढदिवस, अमृतमहोस्तव, पार्ट्या, इत्यादी कार्यक्रम साजरे करण्यासाठी केटरींग उद्योग अथवा हॉटेल व्यवसाय सुरु करण्यास चांगल्या प्रकारचा वाव असून कायम स्वरुपी चालणारा हा व्यवसाय असल्याने आजच्या तरुणांनी या व्यवसायात पडून स्वत:ची बेकारी कमी करुन इतरांनी रोजगार या व्यवसायापासून मिळण्याचा एक सुकर मार्ग आहे. यासाठी भांडवलाची उभारणी करुन व्यवसाय सुरु केल्यास चांगल्या प्रकारचे अर्भाजन मिळवून देणारा हा व्यवसाय आहे.

५) **मोबाईल शॉपी केअर सेंटर व दुरुस्ती केंद्र**

मोबाईल हॅन्डसेट आजच्या आधुनिक युगामध्ये अन्यन साधारण वस्तू म्हणून ओळखली जाते. प्रत्येकाकडे ही वस्तु असून गरजेची वस्तू म्हणून वापरली जाते. गरीब, मध्यम व श्रीमंत कुटुंबे मोठ्या प्रमाणात शहराबरोबरच ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर .सुरु झालेला आहे. देशातील व विदेशातील नावाजलेल्या कंपन्याचे मोबाईल हॅण्डसेटची शोरुम, केअर सेंटर व दुरुस्ती ही केंद्र करुन जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी व एक नवीन उद्योग म्हणून याकडे पाहिले जाते. काही प्रमाणात भांडवल गोळा करुन हा व्यवसाय सुरु करता येतो. एक चांगल्या प्रकारचा उद्योग असून कायम स्वरुपी चालणारा उद्योग असल्याने देशातील सुशिक्षीत तरुणांनी नोकऱ्यांच्या मागे न पडता हे व्यवसाय सुरु करुन एक उद्योजगता म्हणून या व्यवसायाकडे वळण्यास हरकत नाही. नफ्याचे प्रमाण साधारण असले तरी कायमस्वरुपी चालणारा हा व्यवसाय असल्याने अर्भाजन मिळवून देणारा उद्योग आहे.

*Cosmos Multidisciplinary Research E-Journal* Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

**६) रिटेल शॉपी :**

दैनंदिन जीवनामध्ये लागणाऱ्या व घरगुती स्वरुपाच्या वस्तुचा बाजार रिटेल शॉपीच्या माध्यमातून सुरु करता येतात. साधारण भांडवलाच्या साहह्याने एकाच प्रकारच्या वस्तुची विक्री या शॉपीमध्ये करता येते. उदा. खाद्यतेल, साबण, टुथपेस्ट, ऑईल, मोटार सायकलीचे स्पेअर्स पार्टस्, व रेडीमेड कपडे, बुट व चपला इत्यादी वस्तुचे रिटेल शॉपी सुरु करता येतात. शहर व ग्रामीण भागात असे व्यवसाय कमी भांडवल गुंतणुक करुन सुरु केल्यास बेकारी व नवीन रोजगाराच्यासंधी सहज प्राप्त करण्याच्या संधी आहेत. तरुणांनी या व्यवसायाकडे वळण्याचा कल सध्या मोठ्या प्रमाणात असून एक उद्योजकता म्हणूनही हा चांगल्या प्रकारचा व्यवसाय आहे.

**७) नवीन टु व्हिलर भाड्यांचे शोरुम विक्री पॉईट**

सध्याच्या युगामध्ये मोटारसायकल ही वस्तु अत्यावश्यक बनलेली आहे. एक गरजेची सर्वसामान्य कुटुंबाच्या बजेटमध्ये असणारे एकमेव चांगल्या प्रकारचे वाहन म्हणून टू व्हीलर, मोटार सायकल होय, शहर व खेड्यांमध्ये प्रत्येक कुटुंबाकडे हवीस वाटणारी हे वाहन आहे. शहरामध्ये लोकसंख्या वाढीबरोबर गाड्यांची संख्या वाढताना दिसते. तसेच रिक्षा कार या दररोज, नोकऱ्या करणाऱ्यांना प्रवास करणे वेळेच्या दृष्टीने अडचणीच्या वाटतात, यावर एक चांगला पर्याय म्हणजे मोटारसायकल होय. साधारणपणे चांगल्या प्रकारची भांडवल गुंतवणूक करुन नवीन गाड्यांचे शोरुम सुरु करता येतात, तसेच काही शोरुम कडून गाड्यांचे सेल शहराबाहेर विक्री पॉईंट सुरु करुन विशिष्ट कमीशनवर विक्री करता येते. या व्यवसायातून सध्यातरी चांगल्या प्रकारचा नफा असून कायमस्वरुपी चालणारा हा व्यवसाय असल्यामुळे या व्यवयासाकडे आजच्या तरुणांनी वळल्यास करीअरच्या चांगल्या प्रकारच्या संधी आहेत. एक उद्योजकता म्हणून व बेकारी कमी करणारा व्यवसाय असून अनेकांना यामुळे रोजगार मिळू शकतो यासाठी सुशिक्षीत तरुणांनी या व्यवसायाकडे वळण्यास हरकत नाही.

**उद्योगजगतेतील प्रमुख समस्या :**

१. मोठ्या प्रमाणात भांडवल उभारणे कठीण असते.
२. सध्या वाढत चाललेल्या जागेच्या भरमसाट किंमती/भाडे
३. बाजारामध्ये त्रीव स्पर्धा
४. रिटेल व्यवसायात विक्री कालावधी जास्त लागतो.
५. उत्पादन, पॅकींग, वाहतूक या प्रक्रिया दरम्यान काही प्रमाणात नुकसान
६. किरकोळ व्यवसायावर मर्यादा व विक्रीवर परिणाम
७. ग्राहकाला दिला जाणारा दर्जा व सुरक्षितेबाबतची जबाबदारी जास्त.
८. जाहिरात खर्च सहजपणे परवडत नाही.
९. वितरण व्यवस्थेत निर्माण होणाऱ्या समस्या.
१०. मालाचा साठा करण्याची समस्या
११. उत्कृष्ट दर्जा व तांत्रिक समस्या

**भवितव्य व समस्येवर प्रमुख उपाययोजना :**

१. दर्जदार व उपयुक्त वस्तूंचे उत्पादन व विक्रीमध्ये वाढ करणे.
२. ग्राहकांच्या हायजेनिक उत्पादन व वितरण पध्दतीमध्ये बदल करणे.

३. उत्पादन व वितरण करणेसाठी जाहिरात करणे.

४. भांडवल उभारणीचे योग्य मार्ग निश्चीत करणे.

५. मालाचे वितरण थेट ग्राहकांपर्यंत पोचवणेसाठी मार्ग निश्चित करणे.

६. मालाचा साठा व बाजारपेठ निश्चित करणे.

७. विक्री व्यवस्था निश्चीत करणे. उदा. स्थानिक राज्यपातळी.

८. विक्रीपश्चात सेवा व सुविधावर भर देणे.

९. भांडवल उभारणीकरीता कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थाकडून कर्ज उभारणी करणे.

१०. शासकीय निधीसाठी प्रयत्न करुन निधी उभारणे.

११. उद्योजगता संस्थाचे मार्गदर्शन व सल्ला घेणे.

**सारांश :**

उद्योजक ही अशी व्यक्ती असते, जी आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीतून व्यापार संधी अचूकपणे निश्चीत करते. उत्पादनासाठी अथवा व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची जुळवाजुळव करुन स्वत:चे कौशल्य, कार्यक्षमता व उत्तम व्यवस्थापन या गोष्टी अंगीकारुन उद्योग क्षेत्रामध्ये नवीन पावले टाकण्याचा प्रयत्न करतो. उद्योजकता मध्ये व्यवसायाची प्रमुख उद्दिष्टे व ध्येय निश्चीत केल्यानंतर प्रत्यक्ष व्यवसायाला सुरवात केल्यानंतर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात परंतु त्यातून योग्य तो मार्ग निश्चित करुन आपल्या परीने व्यवसाय निवड करुन भविष्यातील वाटचाल करण्याचा प्रयत्न तो करीत असतो. प्रसंगी काही व्यावसायीक संस्थाची योग्य त्या प्रकारची मदत व मार्गदर्शन होऊन निवडलेल्या उद्योगाला बळकटी देण्याचा प्रयत्न करीत असतो. प्रस्तुत लेखामध्ये या विषयांची योग्य ती माहिती नमूद केलेली आहे.

**संदर्भ :**

१) प्रा. केशव गाडेकर, औद्योगिक व संघटनात्मक मानसशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे

२) डॉ. रानडे, पुष्पा, प्राथमिक संख्याशास्त्र व संधोधन पध्दती, डायमंड प्रकाशन, पुणे

३) अर्थसंवाद अंक , २०१५

४) डॉ. मुकुंद महाजन, भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्था, निराळी प्रकाशन, पुणे.

५) प्रा. राम देशमुख, मूलभूत सांख्यिकी (२०१५) विद्या प्रकाशन, नागपूर

६) गुप्ता एस.एस, 'उद्योजकता विकास,' सुलतानचंद आणि सन्स.

७) देसाई वसंत. 'लघुउद्योग व्यवसायाचे व्यवस्थापन,' हिमालया प्रकाशन

८) पांडे जी. एन. 'संपूर्ण यशस्वी मार्गदर्शन उद्योजकता' विकास प्रकाशन

९) डॉ. सोनावणे एम.बी. 'व्यवसायीक उद्योजकता'

१०) डॉ. जाधवर सुधाकर, 'व्यवसायीक उद्योजकता'

११) डॉ. श्रीगावे एस.एल. 'व्यवसायीक उद्योजकता'